जावक क्र. ९०३३ /१७
फरासखाना पो. स्टे. पुणे
दिनांक - ३०/१०/२०१७

प्रती,

मा. जनसंपर्क अधिकारी सो. पोलीस आयुक्त कार्या. पुणे
यांना सविनय सादर,

प्रतीवेदक - जी. डी. नाईक पोलीस उप निरीक्षक, फ. खाना पो. स्टे. पुणे
यांज कडुन विनंती पुर्वक की,

विषय - बेपत्ता इसमाची माहीती सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्द होणे बाबत

---

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन सादर करतो की, फरासखाना पोलीस स्टेशन, मनुष्य मिसींग रजि.क्र. ६२/२०१७ मधील खबरदेणार नामे दिपाली माधव जोशी वय. ४६ धंदा - घरकाम रा.४११,कसबा पेठ पुणे यांचे चुलते नामे शाम व्यंकटेश जोशी वय ६६वर्षे रा.सदर हे दि.२३/१०/१७ रोजी १२.३० ते १४.४५ वा.चे दरम्यान रहाते घरातून कोणास काही न सांगता घरातुन कोठेतरी निघून गेले आहेत म्हणुन सदर मिसींग दाखल आहे. हरविलेल्या इसमाचे वर्णन खालील प्रमाणे.



नांव :-शाम व्यंकटेश जोशी वय.६६ वर्षे अंगाने सडपातळ,रंगाने काळे सावळे दाढी वाढलेली डोकेचे केस व दाढी पांढरी अंगात काळे पावसाळी जॅकेट,काळी पॅन्ट मराठी बोलतो पायात साधी बाटा चप्पल.

तरी यातील वरील मिसींग इसमाचा तपास होणे कामी त्याची माहीती सर्व वर्तमान पत्रांमध्ये प्रसिध्द होणेस विनंती आहे.

जावक क्र. ८०३१ /१७
फरासखाना पो. स्टे.पुणे
दिनांक -३०/१०/२०१७

प्रती,

मा. जनसंपर्क अधिकारी सो. पोलीस आयुक्त कार्या. पुणे
यांना सविनय सादर,

प्रतीवेदक - जी.डी.नाईक पोलीस उप निरीक्षक फ. खाना पो. स्टे. पुणे
यांज कडुन विनंती पुर्वक की,

विषय - बेवारस मयत इसमाचे नातेवाईकांचा तपास होणे कामी सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणे बाबत

---

उपरोक्त विषयान्वये सादर करतो की फरासखाना पो. स्टे. अकस्मात मयत रजि. नं. ९४/१७ सी. आर. पी. सी. १७४ मधील बेवारस पुरुष इसम वय अं. ३५ ते ४० वर्षे हा दि. १६/१०/१७ रोजी १४/२० वा. चे सुमा. त्वष्टा कासार मंदीरासमोर सार्वजनिक रोड वर उभ्या असलेल्या हातगाडीवर, कसबा पेठ पुणे येथे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने पो.हवा. ३१३८ कर्णे यांनी त्यास उपचार कामी ससुन हॉस्पी. येथे नेले असता त्यास डॉक्टर तपासणीपुर्वी मयत झालेला आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.



नाव - एक अनोळखी पुरूष, वय अं. ३५ ते ४० वर्षे, रंगाने गहुवर्ण शरीर कृष झालेले, अंगाने सडपातळ, दाढी, मिशा, साधारण वाढलेली डोक्यावरील केस बारीक काळ्या रंगाचे, चेहरा उभट, नाक सरळ उंची अं. ५ फुट ५ इंच,उजवे हाताचे दंडावर घारीचे (ईगल) चित्र गोंदलेले,डावे हाताचे दंडावर देखील घारीचे (ईगल) चित्र त्यावर क्रॉसचे चित्र मयताचे छातीवर उजवे बाजूस पांढरट फुगवटा आलेला आहे मयत इसमाचे बरगडीचे खाली व बेंबीचे मध्ये जुन्या ऑपरेशनची खुण दिसत आहे.जवळ कुठल्याही मौल्यवान चिजवस्तु नाहीत.

येणे प्रमाणे वर्णनाचा इसम वरील नमुद ता. वेळी व ठिकाणी बेशुध्द अवस्थेत मिळुन आला आहे.

तरी यातील बेवारस मयत इसमाचा व नातेवाईकांचा तपास होणे कामी त्याची माहीती सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.